
■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३१२ ■ बुधवार दि.३० जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 312 ■ Wednesday Dt. 30 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# राजाभाऊ मुंडे आणि बाबरी मुंडेंचा राष्ट्रवादीत प्रवेश ठरला; उपमुख्यमंत्री अजित पवारांची घेतली भेट..!



अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**पंकजा मुंडेंच्या गोटात नाराजीचा स्फोट; निष्ठावंत जुने कार्यकर्ते गमावले?**

# बाबरी मुंडेंची ताकद ७ तारखेला अजितदादांना दिसणार!

## ३५ वर्षांची निष्ठा संपली, दिवंगत गोपीनाथ मुंडे पासून सोबत असलेले राजाभाऊ भाजपला रामराम देणार?

### भाजपमधील असंतोष अजितदादांच्या फायद्यात; पक्षवाढीस मिळणार जबरदस्त ताकद!

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात सध्या मोठी खळबळ उडाली असून भाजपच्या निष्ठावंत नेत्यांपैकी एक असलेले आणि दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत तब्बल ३५ वर्ष राजकारणात कार्यरत असलेले राजाभाऊ मुंडे यांनी अखेर भाजपची साथ सोडण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर येत आहे. त्यांच्या समवेत त्यांचे पुत्र बाबरी मुंडे हे देखील भाजपला रामराम करत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश करणार आहेत.**

राजाभाऊ मुंडे हे पंकजा मुंडे यांचे अत्यंत जवळचे आणि विश्वासू मानले जात होते. मात्र गेल्या काही काळापासून भाजपमधील अंतर्गत नाराजी, स्थानिक राजकारणातील दुर्लक्ष आणि न मिळालेली राजकीय संधी यामुळे ते नाराज असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवून राष्ट्रवादीत जाण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. या घडामोडीमुळे बीड जिल्ह्यातील भाजपसह पंकजा मुंडे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात असून, मुंडे कुटुंबीयांतील ही फुटीची सुरुवात की आणखी काही घडामोडी घडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आगामी काळात या प्रवेशाची अधिकृत घोषणा होणार असून, यामुळे बीडच्या राजकारणाचे चित्र पूर्णपणे बदलण्याची शक्यता आहे. राजाभाऊ मुंडे आणि त्यांचे पुत्र बाबरी मुंडे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश लवकरच निश्चित झाला आहे. आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन हा पक्षप्रवेश अंतिम करण्यात आला आहे. बीडच्या राजकारणात या घडामोडीमुळे खळबळ माजली असून भाजपला हा मोठा धक्का मानला जात आहे.

राजकीय इतिहासात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे राजाभाऊ मुंडे हे दिवंगत गोपीनाथ मुंडे यांचे अत्यंत जवळचे आणि कट्टर समर्थक मानले जात होते. तब्बल तीन दशके त्यांनी गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत निष्ठेने राजकारण केले. भाजप पक्षाच्या वाढीमध्ये त्यांनी सक्रीय योगदान दिले असून, ग्रामीण भागात पक्षाचा पाया भक्कम करण्यासाठी ते सातत्याने काम करत राहिले. राजाभाऊ मुंडे हे बीड जिल्ह्यातील भाजपचे ज्येष्ठ आणि अनुभवी नेते म्हणून ओळखले जातात. गोपीनाथ मुंडे यांच्या पश्चात देखील त्यांनी पक्षाशी निष्ठा कायम ठेवली होती. मात्र सध्या पक्षातील बदलती राजकीय समीकरणं, स्थानिक पातळीवर दुर्लक्ष आणि कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेली नाराजी यामुळे त्यांनी नव्या वाटेवर जाण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

**राजाभाऊ मुंडे राष्ट्रवादीत; अजित पवार यांना मिळणार मोठी ताकद!**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि दिवंगत गोपीनाथ मुंडे यांचे कट्टर समर्थक राजाभाऊ मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)मध्ये जाण्याचा निर्णय घेतल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मराठवाड्यात मोठी राजकीय ताकद मिळणार आहे. राजाभाऊ मुंडेंचा पक्षप्रवेश हा केवळ बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण मराठवाडा आणि ग्रामीण भागात राष्ट्रवादीला नवे बळ देणारा ठरणार आहे. त्यांच्या समवेत कार्यरत असलेले अनेक स्थानिक कार्यकर्ते देखील अजित पवारांच्या नेतृत्वाखाली येण्याची शक्यता आहे. या प्रवेशामुळे भाजपला मोठा धक्का बसला असून, बीडमधील राजकीय समीकरणं बदलण्याची चिन्हं दिसत आहेत. आगामी काळात हा निर्णय अजित पवारांच्या 'मिशन मराठवाडा'साठी निर्णायक ठरू शकतो.



## धनेगाव येथील मांजरा धरणात ८.४३२ दलघमीची वाढ

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात दीड महिन्यानंतर पावसाला सुरुवात झाली असून मागील ४ दिवसांत पडलेल्या पावसाने धनेगाव येथील मांजरा धरणात ८.४३२ दलघमीची वाढ झाली आहे. पावसाने खरीप हंगामातील ८५ हजार हेक्टवरील पिकांना जीवदान मिळाले आहे. त्यामुळे बळीराजाला दिलासा मिळाला आहे. या वर्षी मे महिन्यात केज तालुक्यात दोनशेहून अधिक मिलिमीटर पडलेल्या पावसावर तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या पेरण्या केल्या होत्या. पिकांच्या वाढीसाठी पावसाची गरज असताना जून महिना कोरडा गेला. त्यानंतर जुलै महिना तसाच कोरडा जाण्याच्या मार्गावर होता. वाऱ्याने जमिनीतील ओलावा संपला होता. पावसाच्या प्रतीक्षेत असताना २५ ते २६ जुलै दरम्यान झालेल्या दमदार पावसाने ८५ हजार हेक्टरवरील पिकांना जीवदान मिळाले आहे. या पावसामुळे धनेगाव येथील मांजरा धरणात पाण्याची आवक वाढली असून ४ दिवसांत ८.४३२ दलघमीने वाढ झाली आहे. सध्या धरणात २९.४६ टक्के जिवंत पाणीसाठा असून ९९.२६७ दलघमी इतके पाणी आहे.

## मेळघाटात आश्रम शाळेची भिंत कोसळून १४ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू, तिघी गंभीर जखमी

**अमरावती । प्रतिनिधी**

मेळघाटमधील नागापूर येथील वसंतराव नाईक आदिवासी आश्रमशाळेत भीषण दुर्घटना घडली असून, भिंत कोसळून एका १४ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत इतर तीन विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर नातेवाईक आणि ग्रामस्थांनी जोरदार आक्रमक भूमिका घेतली होती. त्यांच्या मागणीनंतर अखेर प्रशासनाने कारवाई केली आहे. ही घटना घडल्यानंतर आदिवासी विभागाने तात्काळ दखल घेतली असून, शाळेचे मुख्याध्यापक एन.एम.कथे आणि महिला अधीक्षक एस. पी. रावत यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती आहे. प्राथमिक तपासणी करण्यासाठी त्रिस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.

नांदेड जिल्हयातील नायगाव तालुक्यातील सातेगाव येथील जुन्या इमारतीत असेलल्या अंगणवाडीच्या छताचा काही भाग कोसळला. सुदैवाने यात कोणतीही हानी झाली नाही. पावसामुळे आंगणवाडीच्या छताचा भाग कोसळल्यचे सांगण्यात आले. घटनेच्या वेळी काही लहान मुले अंगणवाडीत उपस्थित होती, मात्र सुदैवाने कोणीही जखमी झाले नाही. दरम्यान सातेगावात जीर्ण झालेल्या इमारतीत आंगणवाडी चालते.

## शिक्षकांना तुटपुंजे मानधन

### तासिका तत्त्वावर शिक्षकांची हेळसांड : निर्णयाची अंमलबजावणी होणार का?



**पात्रुड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अर्धवेळ व घड्याळी तासिका तत्त्वावर शिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. हे शिक्षक खाजगी अनुदानित तसेच माध्यमिक आणि उच्च माध्यमिक महाविद्यालयांमध्ये कार्यरत असून त्यांच्यावर पूर्णवेळ शिक्षकांप्रमाणेच अध्यापन, परीक्षा कामकाज, निकाल तयार करणे, अशा अनेक जबाबदाऱ्या येतात. जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या जवळपास प्रत्येक शाळेत असे शिक्षक कार्यरत आहेत. मात्र, अनेक वर्षांपासून या शिक्षकांना अत्यंत तुटपुंजे मानधन दिले जात असल्याने त्यांना कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे.या शिक्षकांच्या सेवेशिवाय शाळांचे शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे चालू राहणे अशक्य होते. त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांचे भवितव्य लक्षात घेऊन अत्यल्प मानधनावरही निष्ठेने अध्यापनाचे कार्य चालू ठेवले आहे. त्यांना आशा आहे की आज नाही तर उद्या आपले मानधन वाढेल, या सकारात्मक दृष्टिकोनातूनच ते आजतागायत कार्यरत आहेत. परिपत्रक येते; पण अंमलबजावणी नाही मागील अनेकवेळा शासनाने घड्याळी तासिका शिक्षकांसाठी परिपत्रके जाहीर केली आहेत. मात्र, जिल्हास्तरावर अधिकारी ती परिपत्रके दुर्लक्षित करून जुन्याच दरानुसार मानधन देत आहेत. त्यामुळे शिक्षकांमध्ये नाराजी आहे.

**अपेक्षा पुन्हा वाढल्या**

३० एप्रिल रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने एक नवा शासन निर्णय जाहीर केला आहे. त्याचा क्रमांक वेतन/१२१४/प्र.क्र. १९१/टीएनटी-३ असा आहे. या निर्णयानुसार उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील घड्याळी तासिका शिक्षकांना ३०० रुपये प्रति तास, माध्यमिक शाळांमधील घड्याळी तासिका शिक्षकांना २५० रुपये प्रति तास दराने मानधन देण्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १ मेपासून होणार असल्याचेही यात नमूद आहे.

**शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण; चिंता मात्र कायम**

या निर्णयामुळे राज्यभरातील घड्याळी तासिका शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, यापूर्वीसुद्धा अशा अनेक निर्णयांची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे यावेळीही प्रत्यक्षात मानधन वाढीची अंमलबजावणी होते की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**राज्यपालांच्या आदेशानुसार निर्णय**

हा निर्णय महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार काढण्यात आला असून उपसचिव तुषार महाजन यांनी शिक्षण संचालनालय (प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक), सर्व विभागीय उपसंचालक, जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी व शिक्षण आयुक्त, पुणे यांना याबाबत सूचित केले आहे.

## स्वतः:च्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधम पित्याला मरेपर्यंत जन्मठेप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वतःच्या रक्ताचं भान न ठेवता अल्पवयीन मुलीवर सातत्याने अत्याचार करणाऱ्या बापाला अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. हा निर्णय सत्र न्यायाधीश अजितकुमार भस्मे यांनी दिला असून, समाजमन हादरवणाऱ्या या घटनेत न्यायालयाने स्पष्ट केले की आरोपीचं कृत्य अत्यंत अमानवी असून त्याला माफ करता येणार नाही.

पिडीत मुलगी आपल्या आई-वडीलांसह उसतोडीसाठी गेली होती. अचानक तब्येत बिघडल्याने दवाखान्यात तपासणी केली असता, ती गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले. आईने विश्वासात घेऊन विचारल्यावर मुलीने सांगितले की, तिचा स्वतःचा बाप बाळु उर्फ बाळासाहेब महादेव गायकवाड (रा. उमराई) हा गेल्या सात-आठ महिन्यांपासून दारू पिऊन, आई घरी नसताना जबरदस्तीने तिच्यावर अत्याचार करत होता. या नराधम कृत्यामुळे ती गर्भवती राहिली. पीडितेच्या तक्रारीवरून धारूर पोलिस ठाण्यात दिनांक ७ फेब्रुवारी २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा क्रमांक २४/२०२४ अंतर्गत खझउ कलम ३७६, ३७६ (२) (एफ), ३७६ (२) (आय), ३७६ (२) (एन) आणि पोक्सो कायद्याच्या कलम ४(२), ६ अन्वये गंभीर आरोप लावण्यात आले. संपूर्ण प्रकरणाचा तपास पीएसआय प्रकाश शेळके यांनी काटेकोरपणे केला. न्यायालयात खटला चालवण्यात आला, त्यामध्ये सरकार पक्षाच्यावतीने एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. पीडिता, तिची आई आणि डीएनए तज्ज्ञ यांच्या साक्षी निर्णायक ठरल्या.

सरकारी वकील ॲड. लक्ष्मण फड यांनी प्रकरणात ठामपणे बाजू मांडली. आरोपीने कृत्य केल्याचे ठोस पुरावे न्यायालयात सादर केले गेले. न्यायालयाने नमूद केले की, अशा दुर्मिळ व संतापजनक घटनांमध्ये आरोपीला अधिकतम शिक्षा देणे गरजेचे आहे. त्यामुळे आरोपीस मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली.

**समाजातून समाधान व अभिनंदन**

या कठोर निर्णयाचे सामाजिक संस्था, महिला संघटना व वकील वर्गातून स्वागत होत आहे. सरकारी वकील ॲड. फड यांचे विशेष कौतुक करण्यात येत असून, न्याय व्यवस्थेने जनतेचा विश्वास बळकट केला असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# संजय गांधी, श्रावण बाळ पेन्शन धारक वंचित!

## प्रदेशाध्यक्ष सुरेश माने यांचे मंत्री अतुल सावे यांना निवेदन



**बीड । प्रतिनिधी**
राज्यातील हजारो दिव्यांग बांधव विविध योजनांच्या लाभांपासून वंचित राहत असून, शासनाच्या डीबीटी यंत्रणेतील तांत्रिक अडथळ्यांमुळे त्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर दिव्यांगांच्या हक्कांसाठी लढा उभारणारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे नेते सुरेश कौशल्या धर्मराज माने यांनी दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे. डीबीटीची यंत्रणा सुधारण्यासह दिव्यांगांसाठी खास घरकुल योजना, ३ टक्के निधी व पुनर्वसन केंद्र यासह विविध मागण्यांवर राज्य शासनाने तत्काळ विचार विनिमय करून त्या अमलात आणाव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.
लाभार्थींना थेट अनुदान मिळण्यासाठी शासन डीबीटी यंत्रणा वापरत आहे. मात्र दिव्यांग बांधवांना डीबीटी करताना प्रचंड त्रास होत आहे. ही यंत्रणा अत्यंत संथगतीने कार्यरत असल्यामुळे लाभार्थींना अनेकवेळा कार्यालयांचे उंबरे झिजवावे लागत आहेत. त्यामुळे संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना यांसारख्या महत्त्वाच्या योजनांचे लाभ लाभार्थींपर्यंत पोहोचत नाहीत, संजय गांधी व श्रावण बाळ योजनेंतर्गत मिळणाऱ्या पेन्शनमध्ये शासनाने एक हजार रूपये वाढ केलेली आहे. ही वाढ तत्काळ मिळवी, डीबीटी अभावी थकलेले सहा महिन्यांचे अनुदानही तत्काळ देण्यात यावे, दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र घरकुल योजना राज्य सरकारने सुरु करावी, दिव्यांग मंत्रालयाच्या पद भरती प्रक्रिया त्वरीत पार पाडावी, व्यवसायासाठी मिळणारे बीज भांडवल १.५ लाख रुपयांवरून ३ लाख रुपये करण्यात यावे, अशी ठाम भूमिका माने यांनी घेतली आहे. याशिवाय प्रत्येक जिल्हा नियोजन समितीमध्ये राजकीय पक्षाचा विचार न करता होतकरू दिव्यांग बांधवांना स्थान देण्यात यावे, आणि १ टक्का निधीतील वाटा वाढवून तो किमान ३ टक्के करण्यात यावा, प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांग भवन उभारण्यासाठी शासनाने जागा उपलब्ध करून त्यासाठी विशेष निधीची तरतूद करावी, पुनर्वसन केंद्रांची उभारणी तातडीने करण्यात यावी. या महत्वाच्या मागण्यांवर शासनाने तत्काळ विचार विनिमय करून त्या अमलात आणाव्यात अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) प्रदेशाध्यक्ष सुरेश माने यांनी केली आहे.

# छाया पांचाळ मृत्यू प्रकरणात चुकीच्या अधिकाऱ्यावर कारवाईचा आरोप; न्यायासाठी सोमवारपासून आंदोलन : पांचाळ




**बीड । प्रतिनिधी**
बीड जिल्हा रुग्णालयात प्रसुतीदरम्यान मृत्यूमुखी पडलेल्या छाया गणेश पांचाळ (वय २५, रा. आंबिलवडगाव, ता.जि. बीड) या महिलेच्या मृत्यू प्रकरणात मुख्य दोषींवर कारवाई टाळत मावशीवरच निलंबनाची कारवाई केल्याचा आरोप करत किष्किंधा पांचाळ (अध्यक्ष - विश्वकल्याण महिला सेवाभावी संस्था) आणि पती गणेश पांचाळ यांनी न्यायासाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे.
छायाबाई यांचा १३ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा रुग्णालयात प्रसुतीनंतर अतिरक्तस्रावामुळे मृत्यू झाला होता. यासंदर्भात वैद्यकीय अधिकाऱ्यांची आणि नर्सची हलगर्जीपणा जबाबदार असल्याचा आरोप करण्यात आला असून मृत महिलेच्या भावाने पोलिस ठाण्यात लेखी तक्रार देत एफआयआर दाखलही केला आहे. या प्रकरणाची चौकशी समिती नेमण्यात आली असून त्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र चौकशी अहवालाच्या आधारे मुख्य दोषींना वाचवून फक्त मावशी रेखा कालिदास पवळे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरण रोग म्हशीला आणि इंजेक्शन पखालीला अशा प्रकारचं असल्याची टीका आंदोलकांनी केली आहे.
जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नर्स यांना वाचवण्याचा प्रयत्न केला असून त्यामुळे त्यांच्यावरच प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच मयत छाया पांचाळ यांच्या कुटुंबीयांना आर्थिक २५ लाखाची मदत देण्याची मागणीही करण्यात आली आहे. या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ०४ ऑगस्ट रोजी (सोमवार) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर न्यायासाठी आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती किष्किंधा पांचाळ आणि गणेश पांचाळ यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केली आहे.

# शिक्षणमहर्षी शामराव गदळेंनी ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा आणली : नंदकिशोर मुंदडा

### दहिफळ वड. येथील शाम गदळे विद्यालयात पंकजाताईंच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, गुणवंतांचा सत्कार

**केज । प्रतिनिधी**
शिक्षणमहर्षी शामराव गदळे गुरुजींनी अथक परिश्रम करून वडमाऊली विद्याप्रसारक मंडळाच्या माध्यमातून ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा आणली. या संस्थेतून शिकलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत आहेत. गदळे गुरुजींच्या शिक्षण क्षेत्रातील वारशाचे जतन त्यांचे सुपुत्र इंजि.शरद गदळे व डॉ शशिकांत दहिफळकर खंबीरपणे करत आहेत, असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी केले.
गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडमाऊली विद्याप्रसारक मंडळ संचलित दहिफळ वडमाऊली येथील श्याम गदळे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा गुरुवारी (दि.२४) सकाळी ११ वाजता पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नंदकिशोर मुंदडा बोलत होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवकृपा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सखाहरी गदळे होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. वासुदेव नेहरकर, मुरलीधर ढाकणे, विजयकांत मुंडे, जालिंदर मोराळे, भाजप तालुकाध्यक्ष भगवान केदार, संस्थेचे अध्यक्ष शशिकांत दहीफळकर, भाजप युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष राहुल गदळे, इंजि. शरद गदळे, बालासाहेब मोराळे, डॉ.धनराज पवार, संदीपान आंधळे, नामदेव आंधळे, समिरसिंह देशमुख, अशोक गायकवाड, नामदेव गायकवाड, काकासाहेब पाळवदे, डॉ.सुग्रीव ढाकणे, बाबासाहेब कोरडे, अशोक वाघमारे, सचिन गायकवाड, दीपक काळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना शाळेच्या गुणवत्तेसह उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजि. शरद गदळे यांनी केले त्यांनी आपल्या दमदार भाषण शैली ने सर्वांची मने जिंकली व पुढील वाटचालीची दिशा दाखवली . सूत्रसंचलन बी. एस. मुंडे यांनी केले, तर आभार डॉ.शशिकांत दहीफळकर यांनी मानले. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील गावांचे आजी-माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठित मंडळी, गुणवंत विद्यार्थी, शाळेचे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शासकीय सेवेत रुजू झालेल्या माजी विद्यार्थी, पालक, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्या जयश्री गदळे, सरपंच अनिता गदळे, जयदत्त गदळे यांनी केले होते.

# पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, फळवाटप



**नांदूर घाट । प्रतिनिधी**
महाराष्ट्राची रणरागिणी तथा पर्यावरण मंत्री पंकजा ताईं यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार नमिता ताई मुंदडा, भाजप चे जेष्ठ नेते नंदकिशोर काकाजी मुंदडा,अक्षय भैय्या मुंदडा, यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप सरचिटणीस शिवाजी जाधव केज तालुका यांनी नांदूर घाट येथे वृक्षारोपण कार्यक्रम, शालेय विध्यार्थ्यांना शालेय साहित्य,फळे वाटप करून तसेच जिल्हा परिषद शाळेला शालेय साहित्य देऊन मोठ्या उत्साहात पार पडला.
वृक्षारोपण व शालेय विध्यार्थ्यांना शालेय साहित्य, फळ वाटप, जिल्हा परिषद शाळेसाठी शालेय साहित्य वाटप केले कार्यक्रमाचे आयोजन शिवाजी जाधव यांनी केले होते व त्यांनी पंकजाताईच्या कार्याविषयी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. पंकजाताई चे कार्य खूप मोठे आहे त्यांच्या कार्याविषयी जर बोलायचे झाले तर पूर्णदिवस पुरणार नाही असे म्हटले व मंत्री पंकजाताईंना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.
भारतीय जनता पार्टीच्या नेत्या तसेच पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नांदुर घाट येथे जिल्हा परिषद शाळेच्या आवारात अंगणवाडी च्या आवारात व समोर वृक्षारोपण करण्यात आले. विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी उपस्थित गावातील प्रतिष्ठित नागरिक माजी पंचायत समिती सभापती शशिकांत आप्पा तारळकर सौदागर जाधव सर भाजपचे ज्येष्ठ नेते दत्ताभाऊ हंगे राजेभाऊ मुंडे देशमुख सर बाबुराव मालदार बाळासाहेब जाधव सावकार भाजपचे जेष्ठ नेते अनंत बप्पा हंगे नितीन घोडके हंगेवाडी चे उपसरपंच बाप्पा हंगे वडार समाजाचे नेते सतीश शिंदे सेवा सहकारी सोसायटी सदस्य कल्याण पवार किशोर कानडे प्राध्यापक सतीश मोराळे सर पत्रकार व शाला समिती अध्यक्ष अमोल जाधव पत्रकार जावेद भाई शेख पत्रकार श्रीकांत राजे जाधव पत्रकार सिद्धेश्वर वरवडे प्रमोद कसबे संदिपान नाळपे सिद्धिविनायकगणेश मंडळाचे अध्यक्ष दत्ता जाधव युवा नेते भाजप पप्पू गोंद्रे दत्ता जाधव पिटी घाट चे आबा तांबडे शशिकांत सारुक अरुण बिबवे पांडुरंग गीते सुशील कानडे धनंजय परबळे शिवकुमार मुंडे, बाबासाहेब केकान सर, अमोल यादव सर, धनंजय बर्डे, संतोष जाधव, विठ्ठल कातळे व जिल्हा परिषद शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षिका व विद्यार्थिनी व सर्व सहकारी मित्र परिवार या कार्यक्रमात नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. यावेळी, पंकजाताईंच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरणपूरक उपक्रम राबवल्याबद्दल नागरिकांनी आनंद व्यक्त केला.
वृक्षारोपण करून, पंकजाताईंना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच, पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व उपस्थितांना सांगण्यात आले. या उपक्रमातून, नांदुर घाट येथे हरित महाराष्ट्र संकल्पनेला बळ मिळाले आहे. यानिमित्ताने विविध ठिकाणी नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी झाडे लावून पंकजाताईना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी गावातील युवा वर्ग, प्रतिष्ठीत नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यकर्माचे सूत्रसंचालन सतीश मोराळे सर व सौदागर जाधव सर यांनी केले तर आभार शाळा समितीचे अध्यक्ष अमोल भैया जाधव यांनी केले. पर्यावरण संरक्षण काळाची गरज आहे.एक वृक्ष लावुन जन्मदिवस साजरा करुया वृक्ष मोठा होई पर्यंत त्या वृक्षाचे संगोपन करुया तरच आपल जिवन अमुल्य प्रदुषण मुक्त होईल व शुध्द हवा मिळु शकेल. आक्सीजन मोठ्या प्रमाणात मिळेल. वृक्षारोपण वृक्षसंवर्धन एक वृक्ष आरोग्य स्वस्थ चला आज पासून संकल्प करुया एक वृक्ष लावुन जन्मदिवस साजरा करुया पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करुया अशी संकल्पना सर्व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली.

# अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त तिरुपती हॉस्पिटल येथे गुरुवारी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**
साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त बीड येथील सुप्रसिद्ध मनका विकार तज्ज्ञ तथा अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. बालाजी नवले यांच्या तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नगर नाका बीड आणि बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक कार्यामध्ये अग्रस्थानी असणारी चळवळीतल्या युवकांची संघटना म्हणून ओळख निर्माण केलेली महाराजा मित्र मंडळ बीड यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तपेढीतील रक्ताच्या पिशव्यांचा तुटवडा लक्षात घेता भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.
महापुरुषांच्या जयंती दिनी बॅनर फटाके हार इत्यादी खर्चाला फाटा देत सामाजिक उपक्रमाने जयंती साजरा करण्याचे काम तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि महाराजा मित्र मंडळाच्या वतीने केले जात आहे. यामध्ये जास्तीत जास्त तरुणांनी रक्तदात्यांनी रक्तदान करून कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन आयोजक तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि महाराजा मित्र मंडळाच्या वतीने सुप्रसिद्ध मनकाविकार तज्ज्ञ डॉ. बालाजी नवले आणि लकी भैय्या कंडेरे यांच्या वतीने करण्यात आले आहे. गुरुवार दि.३१ जूले २०२५ सकाळी १०.३० वाजता तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नगर नाका बीड येथे या भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.
या सामाजिक उपक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून शिव शाहू फुले, आंबेडकर अण्णाभाऊ साठे विचारवंत अजिंक्य भैय्या चांदणे, जिल्हा अतिरिक्त शल्य चिकित्सक डॉ. सदाशिव राऊत, महाराजा मित्र मंडळाचे संस्थापक आकाश भैय्या कंडेरे, सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. निलेश मिसाळ, कान, नाक, घसा तज्ज्ञ राहुल दुबाले, सामाजिक कार्यकर्ते भारत आण्णा कांबळे, पूसरा गावचे माजी सरपंच हरिभाऊ पवार आणि सर्व तिरुपती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कर्मचारी महाराजा मित्र मंडळाचेसर्व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# साहित्याचा महामेरू : अण्णाभाऊ साठे



बुद्ध, फुले, शाहू आंबेडकरांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्राच्या पावन भूमीत सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यातील वाटेगाव या खेडेगावात भाऊराव साठे व बालुबाई साठे यांच्या पोटी ०१ ऑगस्ट १९२० रोजी क्रांतिकारी विचार घेऊन एक महान रत्न जन्मास आले ते व्यक्तिमत्व म्हणजे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे होय. सामाजिक विषमतेचे घोट लहानपणापासूनच अण्णाभाऊंना गटागटा प्यावे लागले. अण्णाभाऊ चा जन्म मागजातीत झाला त्याकाळी माग म्हणजे एक गुन्हेगार जात समजली जायची समाजाला आणि शासकांना ही वाटायचे म्हणून समाज आणि शासन यांची नेहमीच या समाजावर वक्रदृष्टी राहिली.
या समाजाची नेहमीच उपेक्षा आणि निंदा अनालसची व्हायची या सगळ्या बाबींचा अण्णाभाऊ ने स्वतः हा अनुभव घेतला व उघड्या डोळ्यांनी पाहिलं आणि जे भोगलं देखील होत. अण्णाभाऊंना शाळेत दाखल केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी शाळेतील मास्तरांना कसल्याही प्रकारची चूक नसतानाही जातीचा द्वेष व तिरस्कार करत अण्णाभाऊंना शिक्षा केली त्याच गोष्टीचा मनात राग धरून अण्णाभाऊने मनाशी एक खून गाठ बांधली व कायमची शाळा सोडली, अण्णाभाऊंची शाळा दीड दिवसातच सुटली म्हणूनच आण्णाभाऊ साठे हे फक्त दीड दिवस शाळा शिकले असं म्हणतात. मात्र उच्च वर्णी यांची मिरासदारी असलेले शिक्षण अण्णाभाऊंच्या मनाला भावले नाही केवळ दीड दिवस शाळेत जाऊन भेदभावांच्या शिक्षणाला त्यांनी नाकारले. अण्णाभाऊ चे वडील (भाऊराव साठे) हे मुंबईला मजूर म्हणून काम करत होते अधून मधून जमा झालेली तुटपुंजी घरी आणत व त्यातच संसाराचा गाडा कसाबसा चालवीत असत मुंबईतील लोकांचे आरामदायी जीवन पाहून आपल्याही मुलांनी शिकावे सुशिक्षित व्हावे असे त्यांना मनोमनी वाटायचे. काही दिवसांनी त्यांनी स्वतः सोचत अण्णाभाऊंना मुंबईला घेऊन आले मुंबईतील सुशिक्षित व उच्चवधू समाजातील लोकांचे जीवन पाहून अण्णाभाऊंना शिक्षणाची प्रेरणा मिळाली, कामावर जाताना येताना गाड्यांच्या पाठ्या दुकानाच्या पाठ्या हळूहळू बाचायला लागले. तेथील लोकांनी दिलेल्या पुस्तकांचा वापर करून अण्णाभाऊंना वाचन लेखन करता येऊ लागले त्यांना वाचनाचा छंद लागला यच दरम्यान अनेक ठिकाणचे भाषणे सभा ऐकून ते प्रभावित झाले सतत ते लिखाण करायचे व त्यांनी देखील भोगलेले सोसलेले व अनुभवलेले दुःख अवतीभवती पाहिलेले दलितांचे उपेक्षतांचे शोषितांचे कामगारांचे दारिद्र्य जीवन व त्यांची दयनीय अवस्था होत असलेल्या हालापेक्षा अण्णाभाऊंनी वास्तव लेखन करून अख्या विश्वाला स्वतःच्या साहित्यातून बस्तुनिष्ठ स्वरूपामध्ये जगासमोर वास्तववादी जीवनाचे सत्य तेवढ्याच ताकतीने व तळमळीने मांडले. अण्णाभाऊंनी वाटेगाव चे नाव सार्थक ठरवत कुवतिप्रमाने प्रस्थापित समाज व्यवस्थेतील दलित, उपेक्षित, कष्टकरी जीवन जगण्यासाठी धडपड करणाऱ्या सामान्यातल्या अतिसामान्य माणसाच्या दुःखाची कैफियत जगाला आपल्या अर्थपूर्ण साहित्यातून मांडले व वाटेगाव चे नाव जगाच्या पाठीवर आज अजरामर केले. अण्णाभाऊंच्या लेखणीला वास्तवाची धार होती, सत्याची किनार होती आणि माणुसकीची झालर होती, लेखणीतून अण्णा भाऊंनी स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मानवी मूल्यांचा विचार मांडला. अण्णाभाऊ साठे हे पहिले दलित साहित्यिक आहेत. आर्थिक गुलामगिरी पेक्षा मानसिक गुलामगिरी भयानक असून हे गुलामगिरी येथील समाज व्यवस्थेने निर्माण केली आहे. अशा जातीपातीच्या व्यवस्थेला गुलामगिरीतून सुटण्यासाठी उठाव सुरू केला, त्यानी समतेवर आधारलेले माणुसकीचे जग निर्माण करण्यासाठी चातुरवण्र्याव्यावर घाव घालणाऱ्या, फुले, आंबेडकरांचा संदेश अण्णांनी शब्दबद्ध केला. घालूनी घाव मज सांगून गेले भीमराव, गुलामगिरीच्या या चिखलात रुतून बसला का प्रावत अण्णाभाऊ साठे ज्या समाजात जन्मले त्या समाजाला परिपूर्ण पणे उभे करण्याचे काम त्यांनी केले. वास्तव हा अण्णाभाऊंच्या लेखनाचा पैलू होता. दिन, दुबळा, गोर-गरीच शोषित, कामगार यांच्या व्यथा जाणून लेखन करून जगासमोर ठेवण्याचा त्यांनी अथक प्रयत्न केला, अण्णाभाऊंचे असून जग बदल
फकिरा लेखन वाचकांच्या थेट हृदयाला घाव घालणारे विषमतावादी समाजव्यवस्थेतील अन्याय, अत्याचार व शोषणाच्या विरोधात बंड करून उठण्यास चालना देणारे आहे. म्हणूनच अण्णाभाऊंचे साहित्य येथील समाज व्यवस्थेला आत्मचिंतन करण्यास लावणारे आहे, ते परिवर्तनवादी असून प्रेणादायी आहे यात शंकाच नाही. अण्णाभाऊंच्या साहित्याची दखल घेत रशियातील कम्युनिस्ट सरकारने अण्णाभाऊंना रशिया भेटीचे निमंत्रण दिले. अण्णाभाऊ चितोड की राणी या विमानातून रशियाच्या प्रवासाला गेले त्या ठिकाणी भाषणे केली. भाषणामध्ये त्यांनी आवर्जून छत्रपती शिवाजी महाराजांचा अभिमानाने उल्लेख करत त्यांचे पोवाडे गायले, शिवरायांची कर्तबगारी अण्णाभाऊंनी शाहिरीच्या माध्यमातून रशियामध्ये पोहोचवली. शोषित समाजाला शोषणमुक्त करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कथा, कादंबऱ्या, पोवाडे, लोकनाट्य, नाटके लिहिली अण्णांचे सहकारी अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लाल बावटा या कलापथकाची स्थापना केली. हाती खंजेरी व डफली घेऊन आपल्या उत्कृष्ट अभिनयाद्वारे रंगमंचावर उभा राहून कामगारांच्या शोषित व पीडित उपेक्षित वर्गाची संघषांची जीवनगाथा श्रोत्यांसमोर सादर केली. याच दरम्यान संयुक्त महाराष्ट्राच्या लढा सुरू झाला. या लढा दरम्यान अण्णाभाऊंनी महाराष्ट्राच्या फाळणीवर द्विअर्थी कचन गायले माझी मैना गावावर राहिली माझ्या जीवाची होतीया कायली या द्विअर्थी लावणीने संयुक्त महाराष्ट्राचा लढा अधिक गतिमान केला व मुंबई ही महाराष्ट्रचीच आहे याचा पाठपुरावा केला. अण्णाभाऊ साठे म्हणजे साहित्यातील रत्न, साहित्य विश्वातील चमत्कार, कारण करल्याही प्रकारचा शैक्षणिक वारसा व वातावरण नसताना अठराविश्व दारिद्र्य लाभलेल्या व फक्त नावाला शाळेत गेलेल्या अण्णाभाऊंनी १४ कथासंग्रह, ३५ कादंबऱ्या, १० पोवाडे, १४ लोकनाट्य, नाटके व कविता प्रवास वर्णन ऐवढे विपुल हृदयस्पर्शी साहित्य लिखाण केले त्यांच्या साहित्याचे वाचन करताना एक गोष्ट नक्कीच जाणवल्याशिवाय राहत नाही, ती म्हणजे एखाद्या सुसंस्कृत व उच्च विद्याविभूषित साहित्यकाला ही लाजवील एवढी उच्च दर्जाची अण्णाभाऊंची साहित्यरचना आहे. अण्णाभाऊंची फकीरा ही कादंबरी स्फोटक कलाकृती आहे, क्रांतीची बिनी मारायची असेल तर, जग बदलण्यासाठी विषमतावादी, समाज रचनेवर विचारांचा घाव घातलाच पाहिजे, म्हणून अण्णाभाऊ सांगतात 'तू गुलाम नाहीस तू या जगाचा मालक निर्माता आहेस' ही पृथ्वी शेषाच्या मस्ताकावर तरलेली नसून ती श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे हा साक्षात्कार करून देगारा विचार मानवी समाजाच्या समतेच्या लढ्याला प्रेरणादायी आहे. त्यांच्या कादंबऱ्यावर चित्रपट निर्मिती करण्यात आलेली आहे.
आवडी या कादंबरीवर टिळा लावते रक्ताचा, अलगुज वर अशी ही साताऱ्याची तहा, फकीरा वर फकीरा, माकडीचा माळ वर डोंगराची मैना, वैजयंता चारागावचे पाणी, बारणेचा वाघ वर वारणेचावाध अशी दर्जेदार चित्रपटांबी निर्मिती देखील झालेली आहे. अण्णाभाऊंच्या साहित्याचे महत्त्व परदेशात गाजले आहे. परंतु अण्णाभाऊ सारख्या प्रतिभावंत साहित्यकला भारत सरकारने, समीक्षकांनी विचारवंतांनी मात्र दुर्लक्षित ठेवले. अण्णाभाऊंच्या चिखलातील कमळाने अग्नीदिव्य उभे केले, वारणेच्या खोऱ्यात अलगुजचे सूर्य घुमविले, माकडीच्या माळावर केवड्याचे कणीस रुजू घातले, आग, अहंकार, वैर ला रूपांकार दिला. अण्णाभाऊंच्या लेखणीला तलवारीची धार होती अण्णाभाऊ एक वेगळाच उसा घेऊन जन्मास आले होते. आयुष्यभर अन्यायाविरुद्ध डरकाळी फोडली.. डरकाळी फोडणाऱ्या या वाटेगावच्या बापाला जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व विनम्र अभिवादन..!



**विनोद भुजंगराव पाटोळे**
(सहशिक्षक सरस्वती विद्यामंदिर बीड) मो.नं. ८२७५००४२९९

# बीड जिल्ह्यात ७३.६६% शेतकऱ्यांनी घेतला फार्मर आयडी

## प्रशासनाचे शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढून घेण्याचे आवाहन





**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या फार्मर आयडी नोंदणी मोहिमेला बीड जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यातील एकूण ६,२१,५१६ पात्र शेतकऱ्यांपैकी ४,६१,८८९ शेतकऱ्यांनी आपली फार्मर आयडी नोंदणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. हे प्रमाण ७३.६६ टक्के इतके असून, उर्वरित शेतकऱ्यांनी तातडीने आपली नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन केले आहे. २४ जुलै रोजी सर्व महसूल अधिकाऱ्यांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली होती. यावेळी अपर जिल्हाधिकारी सर्व उपजिल्हाधिकारी तहसीलदार उपस्थित होते. या बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी यांनी उर्वरित शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तात्काळ काढून घेण्याबाबत आवाहन केले होते. यासंदर्भात बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे - सोनवणे आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी संयुक्तपणे जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना लवकरात लवकर फार्मर आयडी काढण्याचे आवाहन केले आहे.

या विषयाच्या संदर्भाने आणि इतर विषयांबद्दल बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी, सर्व ग्राम महसूल अधिकारी, सर्व कृषी सहाय्यक यांची संयुक्त बैठक सामाजिक न्याय भवन येथे घेतली. यावेळी नुकताच पदभार घेतलेले गटविकास अधिकारी अशोक राठोड, तालुका कृषी अधिकारी अशोक साळी व इतर अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना तहसीलदार शेळके यांनी नमूद केले की फार्मर आयडी ही शेतकऱ्यांची अधिकृत ओळख आहे. याशिवाय कोणत्याही शासकीय शेतीसंबंधित योजनेचा लाभ घेता येणार नाही. यामध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, नमो सन्मान निधी, पीक विमा, पीक कर्ज, नैसर्गिक आपत्ती भरपाई, धान खरेदी तसेच पंचायत समिती आणि महसूल विभागाच्या विविध योजनांचा समावेश आहे.

फार्मर आयडीसाठी शेतकऱ्यांना आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रावर (सी एस सी) जावे लागेल. यासाठी आधार कार्ड, ७/१२ किंवा ८अ उतारा आणि आधार लिंक असलेला मोबाईल नंबर आवश्यक आहेत. जिल्ह्यातील धारूर तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ८४.२१ टक्के शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून, वडवणी तालुक्यात हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ६२.७२ टक्के आहे. बीड, आष्टी, केज, गेवराई, पाटोदा आदी तालुक्यांमध्येही नोंदणीचे प्रमाण ७५ टक्क्यांहून अधिक आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शेतकऱ्यांनी जर फार्मर आयडी काढले नाही तर भविष्यात कोणतीही सरकारी मदत किंवा योजना त्यांना मिळणार नाही. त्यामुळे ही नोंदणी हक्काची आणि गरजेची असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.



## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड तालुकाध्यक्षपदी ॲड. राजेंद्र राऊत

**बीड । प्रतिनिधी**


बीड तालुक्यातील नाळवंडीचे सरपंच तथा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ॲड. राजेंद्र राऊत यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड तालुकाध्यक्षपदी मंगळवारी (दि.२९) मुंबई येथे निवड करण्यात आली. त्याबद्दल पदाधिकारी, कार्यकर्त्यांमधून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. या निवडीची घोषणा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आ. अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या सूचनेवरून करण्यात आली.

मुंबईत छोटेखानी कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, प्रदेश सरचिटणीस माजी आ.अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते ॲड. राजेंद्र राऊत यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस बाबासाहेब घुगे, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, माजी नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ, प्रदीप गायकवाड यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### हॉटेल रूद्रसाई काळं वाटणं कंदुरी मटनचे भास्कर शिंदेच्या हस्ते उद्घाटन

## मातंग समाजाने उद्योग क्षेत्रामध्ये भरारी घ्यावी : शाहिर ढगे






**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये आज सुद्धा अस्सल खवय याची चव गावरान मेवा मांसाहारी जेवण असेल किंवा शाकाहारी जेवण असेल बीड जिल्हा सोडल्याच्या नंतर इतर जिल्ह्यांमध्ये बीड जिल्ह्यातील जेवणासाठी चव चाखायला मिळत नाही कारण बीड जिल्ह्यातील मांसाहार असेल किंवा शाकाहार या जेवणाची क्वालिटी आणि खासियत जिल्ह्यातील जनतेच्या हातून अनेक खवय्यांना आपल्या सेवेची गुरव पाडले आहेत. बीड जिल्ह्यामध्ये मात्र आता अनेक कंदुरी मटण हॉटेल मच्छी खाणाऱ्यांची आवडीचे हॉटेल यातच आता बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील परभणीकडे जाणारा माजलगाव छक२२२ नॅशनल हवे कल्याण टू विशाखापटनम माजलगाव परभणी फाट्या (कृषिरत्न वसंतराव नाईक चौक) पासुन ७ कि.मी. पवारवाडी फाट्यावर प्रसिद्ध हॉटेल रुद्र साई स्पेशल काळा वाटण कंदुरी मटण या हॉटेलचे उद्घाटन लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष मातंग हृदय सम्राट लहूश्री भास्करनाना शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले. या हॉटेलचे ओनर रंजीतभाऊ कसबे व महादेव शिंदे यांनी भास्कर शिंदे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शाहीर युवराज ढगे उपस्थित होते.

मातंग समाजाच्या आणि तरुणांना उद्योगाकडे वळावं आणि उद्योग क्षेत्रामध्ये आपलं नाव लौकिक करा व साई रुद्र हॉटेलचे महाराष्ट्रभर नाव व्हावे असेही शुभेच्छा यावेळी दिले तर भास्कर शिंदे यांनी सांगितले की, मातंग समाजाचे अनेक कार्यकर्त्यांनी उद्योग क्षेत्राकडे वळण्यासाठी आपण त्यांना सर्व परीने मदत करून मातंग समाजाला विकासाच्या प्रवास आणण्यासाठी उद्योग क्षेत्रामध्ये आपण सदैव सोबत राहू असेही यावेळी भास्कर शिंदे यांनी म्हटले आहे तसेच विशेष उपस्थिती म्हणून कीर्ती धुमाळ या हॉटेलचे मालक डॉक्टर रणजीत कसबे महादेव शिंदे यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले आहे. रुद्र साई हॉटेल ला पुढील कार्यासाठी भरभरून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखा केज यांच्या वतीने नवनिर्वाचित पत्रकार पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ



**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखा-केज यांच्या वतीने नव निर्वाचित पत्रकार पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ शासकीय विश्रामगृह, केज येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रकाशपर्व न्यूज पोर्टल बीड जिल्हा संपादकपदी लिंबराज शंकरराव गायकवाड, दैनिक वादळ वार्ता बीड जिल्हा संपादक पदी कपिल अंबादास मस्के आणि पुरोगामी पत्रकार संघ बीड जिल्हाध्यक्ष पदी रणजित तात्याराम घाडगे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास केज तालुक्यातील विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, शाखा केजचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील हे होते. त्यांच्या सोबत तालुका उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड, पांडुरंग कसबे, नंदूलाल मिसाळ, पुरोगामी पत्रकार संघ केज तालुकाध्यक्ष दिनकर जाधव, सक्रिय पत्रकार संघ केज तालुकाध्यक्ष संतोष गालफाडे, सह्याद्री पत्रकार संघ केज तालुकाध्यक्ष अनिल ठोंबरे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात पत्रकार धनंजय कुलकर्णी, मुब्बशीर खतीब, सचिन भालेराव, महादेव काळे, दीपक नाईकवाडे, दत्तात्रय मुजमुले, बाळासाहेब जाधव, सुहास चिद्रवार, अनिल वैरागे, संभाजी ब्रिगेडचे राहुल खोडसे, पत्रकार मनोराम पवार, दिलीप खाडे, सचिन लांडगे, मुनीर कुरेशी, कल्याण मस्के, बलभीम मस्के, लक्ष्मण ओव्हाळ, भगवंत वायबसे, दत्ता गायकवाड, सरपंच शशिकांत इंगळे, लक्ष्मण ओव्हाळ, भगवंत वायबसे, आश्रुबा खरात यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन दैनिक वादळ वार्ताचे संपादक अजय भांगे यांनी केले. तसेच प्रास्ताविक पांडुरंग कसबे यांनी तर आभार प्रदर्शन चंद्रकांत पाटील यांनी केले. सत्कारमूर्ती कपिल मस्के, रणजित घाडगे आणि लिंबराज गायकवाड यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. सत्कारप्रसंगी शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व पेन देऊन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी उपस्थितांचे योगदान व उपस्थितीमुळे समारंभ यशस्वीरीत्या पार पडला.

## लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न द्या : विकास गायकवाड



**गेवराई । प्रतिनिधी**

थोर समाज सुधारक क्रांतिकारी विचारवंत, थोर साहित्यिक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोत्तम पुरस्कार देऊन सन्मानित करावे, अण्णाभाऊ साठे यांनी वंचित शोषित पीडित व कामगार वर्गासाठी मोठा लढा उभारून आपल्या लेखन कविता पोवाडा लोकनाट्याच्या माध्यमातून सामाजिक क्रांतीचे रणसिंग फुंकले होते.

दीड दिवस शाळेत शिकलेले अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या कार्यकाळात पस्तीस उपन्यास तेरा लोकनाट्य पंधरा प्रसिद्ध शाहिरी पोवाडे तेरा कहानी संग्रह सात चित्रपटांची कथा एक शाहिरी पुस्तक असल्या अनेक पुस्तकांचे व कादंबऱ्यांचे नाटकांचे लिखाण केले आहे. वाटेगाव ते मुंबई पायी पदयात्रा काढणाऱ्या थोर साहित्यकार आण्णाभाऊ साठे यांचे साहित्यिक भारतातच नव्हे तर साता समुद्र पलीकडे जाऊन पोचले अण्णाभाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात अग्रगण्य भूमिका बजावली होती. अण्णाभाऊ साठे यांचे जीवन कार्य भारतीय संविधानांचे मूल्य समानता बंधुत्व आणि न्याय अशी होती तरी अशा थोर समाज सुधारक साहित्यिक लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना केंद्र सरकारने भारताचा सर्वोच्च मानला जाणारा मरणोत्तर भारतरत्न हा पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करावा, अशी मागणी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे शिष्टमंडळ व बीड जिल्हा अध्यक्ष विकास गायकवाड लवकरच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रत्यक्षात भेटून निवेदनाद्वारे करणार आहोत, अशी माहिती बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

## जय हनुमान गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी धोतरे तर सचिव फरताडे यांची निवड

**धारूर । प्रतिनिधी**





शहरातील जय हनुमान मंडळाची आयोजित गणेश उस्तव २०२५ नियोजन बैठक नुकतीच पार पडली असून जय हनुमान गणेश मंडळाची बैठक जेष्ठ मार्गदर्शक मदन धोतरे व आजी माजी पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित बैठक संपन्न झाली. यावेळी सर्वानुमते अध्यक्षपदी प्रदीप धोतरे, उपाध्यक्ष अभी कापसे, सचिव पदी ओम फरताडे तर कोषाध्यक्ष प्रशांत गोंदणे, सहकोषाध्यक्ष सचिन चिरके या सर्वांची निवड करण्यात आली.

यावेळी विविध पदांच्या देखील नियुक्त्या करण्यात आल्या सांस्कृतिक प्रमुख पवन धोतरे, रोहित कदम यांची निवड करण्यात आली. यावेळी उपस्थित मंडळाचे सदस्य दत्ताभाऊ गोंदणे, दत्ताभाऊ बोरगावकर, सुभाष पवार, प्रवीण धोतरे, रामेश्वर मनेरी, सुनील गैबी, बालाजी धोतरे, दीपक अभंगे, महेश गवळी, धनराज धोतरे, गणेश बसवर, आकाश गवळी,अमर औताडे, महारुद्र गोंदणे, दीपक चिरके, अक्षय धोतरे या सह मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अशोक राठोड यांची बीड पंचायत समिती गटविकास अधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. समवेत पं स.सदस्य उत्तरेश्वर सोनवणे, सरपंच विलास सावंत, युवा नेते अमोल भैय्या राऊत, रुग्णसेवक सुरेश पवार, पत्रकार अंकुश गवळी, भाजप यूवा नेते संदिप गांडगे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब काळे आदी उपस्थित होते.



## राजस्थानी प्राथमिक विद्यालयात नागपंचमी सण साजरा

**बीड । प्रतिनिधी**

आज विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच आपल्या संस्कृतीची ही माहिती व्हावी या उद्देशाने शाळेमध्ये आज नागपंचमी सणसाजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ जाजू मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ बियाळे मॅडम या होत्या तर प्रमुख वक्ते म्हणून तोष्णीवाल व सौ चांडक या होत्या. यावेळी प्रमुख वक्ते श्री तोष्णीवाल सर यांनी यादव काळा पासून आज पर्यंत कश्या पद्धतीने नागपंचमी सणं कसा साजरा करतात ते यावेळी सांगितले. तसेच श्रीकृष्ण व कालिया सापाची गोष्ट यावेळी विद्यार्थ्यांना सांगितली. सौ चांडक यांनी यावेळी सुंदर असे गीत यावेळी सादर केले. प्रमुख पाहुणे सौ बियाळे मॅडम यांनी अक्कण माती चिकन माती हे सुंदर असे गीत सादर केले. यानंतर वारूळाचे पुजन करण्यात आले. अध्यक्षीय समारोप करताना सौ जाजू मॅडम यांनी महाभारत काळात, राजा परीक्षिताचा मुलगा, जन्मेजय याने आपल्या वडिलांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी सर्प यज्ञ केला, ज्यामुळे नागांचा नाश झाला. अस्तिक ऋषींनी सर्व नागाणा मुक्त केले असे मानले जाते की श्रावण शुक्ल पक्षाच्या पाचव्या दिवशी नाग लोकात एक विशेष उत्सव असतो. नाग लोकांनी अस्तिक ऋषींना गुरु मानले असे प्रतिपाद सौ. जाजू मॅडम यांनी केले. यावेळी मुलींसाठी झोका व झिम्मा फुगडी खेळण्याची सोय मुख्याध्यापक सोहनी सर सांस्कृतिक विभाग प्रमुख लड्डा सर, बोरा सर, बियाणी सर यांनी यावेळी शाळेत केली होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ सुराणा यांनी केले. तर आभार प्रदर्शन बोरा यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**बीड :** मोंढा भागातील चंपावती सेल्स दुकानाचे नविन जागेत स्थलांतर झाले, त्याबद्दल दुकान मालक दिनेश चांडक यांना शुभेच्छा देताना फहीम इनामदार, पोलीस बॉईज असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रविंद्र शिनगारे.

## लोकशाहीर डॉ.आण्णा भाऊ साठे जन्मोत्सवानिमित्त त्यांच्या जीवनप्रवासाचे संकलन : आकाश कांबळे



**तलवाडा । प्रतिनिधी**

साहित्यरत्न डॉ.आण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव साठे व आईचे नाव वालुबाई साठे होते. अण्णाभाऊ हे शाळेत शिकलेले नाहीत, ते केवळ दीड दिवस शाळेत गेले नंतर तेथील सवर्णाद्वारे होणाऱ्या भेदभावामुळे त्यांनी शाळा सोडून दिली. त्यांनी दोन लग्न केली होती त्यांची पहिली पत्नी कोंडाबाई साठे तर दुसरी जयवंता साठे ह्या आहेत. त्यांना एकूण तीन अपत्य होती. मधुकर, शांता, आणि शकुंतला त्यांचे शालेय शिक्षण झालेले नाही, तरीसुद्धा त्यांनी प्रयत्नपूर्वक अक्षर ज्ञान मिळविले हे बाहेरील जगातून स्वतःहून अक्षरफोड करून घेतली. १९३२ साली वडिलांसोबत मुंबईला आले. चरितार्थासाठी कोळसे वेचने, फेरीवाल्यांच्या पाठीशी गाठोडे घेऊन हिंडणे, मुंबईच्या मोरबाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी केली, अशी अनेक मिळतील ती कामे त्यांनी केली. मुंबईत कामगारांचे कष्टमय, दुःखाचे जीवन त्यांनी पाहिले.

त्यांचे संप, मोर्चे पाहून त्यांचा लढाऊपणाही त्यांनी अनुभवला. नियतीने वेगळेच रूप दाखवले वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची सगळी जबाबदारी अंगावर पडल्याने ते पुन्हा आपल्या गावी आले. तेथे बापू साठे या चुलत भावाच्या तमाशाच्या फडात ते काम करू लागले. पुढे १९४२ च्या चळवळीत सहभागी झाल्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर पकड वॉरंट काढले. पोलिसांना चुकवीत ते मुंबईला आले. मुंबईत लोकशाहीर म्हणून त्यांचा लौकिक झाला. त्यावेळी अमर शेख या ख्यातनाम मराठी लोकशाहीरांबरोबर अण्णाभाऊंचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले. त्यांनी लिहिलेला 'स्तालिनग्राडचा पोवाडा' १९४३ साली पार्टी या मासिकात प्रसिद्ध झाला.

त्यांनी १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने 'लालबावटा' कलापथक स्थापन केले. बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. । जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव । हे त्यांचे गीत खूप गाजले. त्यांनी लिहिलेल्या लावण्यात 'माझी मैना गावावर राहिली', आणि 'मुंबईची लावणी' या अजोड आणि अविस्मरणीय आहेत. अतिशय तळमळीने लिहिण्याची त्यांची वृत्ती होती. 'पृथ्वीही शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे', असे ते म्हणत आणि हाच त्यांच्या लेखनाचा प्रेरणास्त्रोत होता. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख दारिद्र्य, त्यांच्या साहित्यातून प्रकट होत होते. अण्णाभाऊंची निरीक्षण शक्ती सूक्ष्म होती. त्यांच्या लेखन शैलीला मराठमोळा, रांगडा पण लोभस घाट आहे.

महाराष्ट्रातील विद्यापीठात अण्णाभाऊ ११ प्रबंध सिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ 'अण्णाभाऊ साठे' अध्यासन सुरू करण्यात आले आहे. त्यांच्या कथा कादंबऱ्या केवळ भारतीयच नव्हे तर, बावीस परकीय भाषात भाषांतरित झाल्या आहेत. आज मातंग समाजासाठी अनेक योजना अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने मिळत आहेत. आर टी ची स्थापना झाल्यामुळे विद्यार्थ्यांना याचा आर्थिक फायदा होत आहे. फक्त आता अण्णाभाऊंना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात यावे फक्त एवढीच महाराष्ट्रातील मातंग समाजाची अपेक्षा आहे. तलवाडा सारख्या छोट्या गावात अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यात आलेला आहे याचा गेवराई तालुक्यातील मातंग समाजाला अभिमान वाटत आहे. अण्णाभाऊ साठे जन्मोत्सव २०२५ संपूर्ण भारतभर साजरा करण्यात येत आहे, अशा या महामानवाला त्यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त नतमस्तक होऊन विनम्र अभिवादन करतो.

# माजलगावकरांना होतंय शेवाळ युक्त गढूळ पाणी पुरवठा

## नागरिकांच्या जीवाशी खेळ ब्लिचिंग पावडरचा वापर नसल्याने पाण्यात येतो दुर्गंध वास

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथील नगरपालिकेने दर महिन्याला पाणीपुरवठ्यावर लाखो रुपये खर्च करून ही शहरवासीयांना मागील पाच-सहा महिन्यापासून अशुद्ध पाणीपुरवठा केला जात आहे. सध्या या पाण्यात पालापाचोळ्यासह शेवाळ येऊ लागले आहे. बिलचींग पावडरचा वापर होत नसल्याने पाण्याला दुर्गंधी वास येत आहे. यामुळे माजलगाव शहरवासीयाच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याने नागरिकाच्या जीविताशी खेळणाऱ्यावर कारवाईची मागणी होत आहे.

माजलगाव येथील नगरपालिकेवर गेल्या अनेक वर्षापासून प्रशासक असल्याने व सध्या प्रभारी प्रशासक नियुक्ती केल्याने नगरपालिकाचा कारभार बेभरोसे सुरू आहे. येथील कर्मचारी प्रशासकाचे नियंत्रण नसल्याने माजलगाव नगरपालिकेत कर्मचारी कधीही येतात व कधीही जातात यामुळे अनेकांचे कामे रगडलेली आहेत. नगरपालिकेकडून शहरातील

### लिकेज कडेही माजलगाव नगरपालिकेचे दुर्लक्ष

शहरवासी यांच्या आरोग्याचा धोका निर्माण झालेला असताना माजलगाव नगरपालिका प्रशासनाचे जाणून बुजून दुर्लक्ष होत आहे. शहरात जागोजागी असलेले लिकेज काढण्याचे काम या टेंडर मध्ये असताना शहरातील एकही लिकेज काढले नसल्याचे सांगितले जात आहे. या पाणीपुरवठा टेंडर धारक स्वच्छता व पाणीपुरवठा अभियंता यांचे अभय असल्याचे बोलले जात आहे.

नागरिकांना वेळेत पाणी मिळावे यासाठी पाणीपुरवठावर महिन्याला आठ लाख रुपये खर्च करून टेंडर काढ ण्यात आले आहे. या टेंडर चालकाने शहराला वेळेत व शुद्ध पाणी द्यावे अशी अट आहे. परंतु संबंधित ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे माजलगाव शहराला सहा ते आठ दिवसाला पाणीपुरवठा होत आहे हे पाणी शुद्ध देण्याऐवजी नळाला पूर्णपणे अशुद्ध पाणी येत आहे.

या पाण्याला फिल्टर केले जात नसल्याचेही सांगितले जात आहे. पाण्यात ब्लिचिंग पावडर व तुरटीचा किंचितही वापर केला जात नसल्याने पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचारी यांनी सांगितले. यामुळे शहरात नळाद्वारे येणारे पाणी पूर्णपणे अशुद्ध शेवाळयुक्त असून पालापोचोळाही पाण्यात येत आहे. हे पाणी पिताना अक्षरशः दुर्गंध वास येत असल्याने पाणी पिण्यासाठी हातात घेतलेला गिलास तसाच ठेवावा लागतो. नगरपालिकेचे स्वच्छता व पाणीपुरवठा अभियंता हे मागील अनेक वर्षातून या टेंडर धारकावर मेहरबान असून त्यांचा कारभाराची चौकशी करावी, अशी मागणी विविध संघटनेने आतापर्यंत अनेक वेळा केलेली आहे.





# मोकाट जनावरांचा वाहतुकीस अडथळा

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील मेन रोड शास्त्री चौक राष्ट्रीय महामार्ग या वाहतुकीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरे वावरतात त्यामुळे रस्त्यावरून जाताना लहान मुले महिला पुरुष यांना खूप त्रास होतो. मोकाट जनावरे हे रस्त्याच्या मधोमध उभे राहतात तर कधी कधी रस्त्यांमध्ये बसतात त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो आणि रस्त्यावर वाहतूक कोंडी होते.

मोकाट जनावराच्या कधीकधी झुंजही लागतात त्यामुळे महिला, पुरुष, शाळकरी मुलांना रस्त्यावरून जाताना जीव मोठी धरून चालावे लागते. रस्त्यावरील जनावरामुळे वाहनांनाही खूप मोठी अडचण होते. तरी या जनावरचा बंदोबस्त करून जनावरांना कोंडवाड्या त टाकावे अशी मागणी नागरिक करत आहेत. सविस्तर वृत्त असे की गेवराई शहरांमध्ये प्रत्येक रस्त्यावर प्रत्येक गल्लीमध्ये मोकाट जनावरांचा जास्त प्रमाणात वावर आहे. या जनावरामुळे सर्वसामान्य नागरिक, शाळकरी मुले महिला यांना खूप त्रास होतो कधी कधी भर रस्त्यावर जनावरांची झुंज लागते यामुळे शाळकरी मुलांना आपला जीव मुठीत घेऊन ये जा करावी लागते.

मोकाट जनावरे भर रस्त्यावर बसतात यामुळे वाहतुकीची अडचण होते. गेवराई शहरातील बाजाराच्या दिवशी खूप मोठा बाजार असल्यामुळे बाजारामध्ये खूप मोठी गर्दी असते या गर्दीमध्ये सुद्धा मोकाट जनावरे बाजारामध्ये फिरतात कधीकधी लागते यामुळे बाजार करणाऱ्या महिला पुरुषांना सुद्धा खूप त्रास होतो.

### नगरपालिका प्रशासनाने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करून जनावरांना कोंडवाड्यात टाकावे

नगरपालिका प्रशासनाने या अगोदर कारवाई केली होती परंतु परत मोकाट जनावरांचा वावर जास्त प्रमाणात वाढला आहे. यामुळे नागरिकांना त्रास होतो हा त्रास होऊ नये यासाठी प्रशासनाने जनावरांना कोंडवाड्यात टाकून जनावरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी गेवराई नागरीक करत आहेत.

### साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती दिनी संपुर्ण महाराष्ट्रात दारु बंद ठेवण्यात यावे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत दिले निवेदन

**नांदेड । प्रतिनिधी**

साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनी १ ऑगस्ट रोजी संपूर्ण महाराष्ट्रात दारू विक्री बंद ठेवावी व सार्वजनिक शासकीय सुट्टी जाहीर करावी. अशा आशयाचे निवेदन जिल्हा जयंती मंडळ नांदेड च्या वतीने मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई द्वारा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांचे मार्फत निवेदन देवून मागणी करण्यात आली. या मागण्या त्वरित मान्य कराव्यात अन्यथा राज्यभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

यावेळी डॉ. अण्णाभाऊ साठे जिल्हा जयंती मंडळ नांदेड चे संयोजक गणेश



अण्णा तादलापूरकर, उपाध्यक्ष मारुती चिवळीकर, सचिव राजू जाधव उर्फ ईश्वर अण्णा जाधव, सल्लागार प्रा. देविदास इंगळे, गणपत रेड्डी, सुरेश तारू वांगीकर, संजय गायकवाड, दिगंबर घायाळे, सतीश डोंम्पले, सोनू रेड्डी, भगवान जाधव, साई जाधव, खंडू वाघमारे, दत्ता गायकवाड, बबन संपते आदी मान्यवर उपस्थित होते.

### आष्टी तालुक्यात कालबाह्य झालेल्या खाजगी वाहनातून विद्यार्थ्यांची वाहतूक!

# आरटीओ, पोलीस प्रशासन गप्प का?

**दौलावडगाव । प्रतिनिधी**

कालबाह्य झालेल्या स्कुल बसेस व खाजगी क्लुझर, पेरिक्षा, लहान मोठी १५० च्या वर वाहने शाळकरी मुलांना घेऊन दररोज बिनधास्त रस्त्यावर धावतात आरटीओ कधी याची तपासणी करत नाहीत. अन् पोलीस, प्रशासन देखील याकडे कानाडोळा करतात. मात्र यामुळे विद्यार्थीच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांकडून अश्या कालबाह्य वाहनांची चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

आष्टी तालुक्यात अनेक सेमी इंग्रजी, मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पालक आपल्या मुलांना आष्टी, कडा, धानोरा, धामणगांवसह ठीक ठिकाणी असलेल्या शाळेत शिक्षणाला पाठवतात. यासाठी



तालुक्यात एकूण १०० च्यावर स्कुल बस, ७० ते ८० व खाजगी वाहने मुलांना शाळेत सोडतात. व शाळा सुटल्यावर त्यांना घरी आणतात त्यासाठी मोठी रक्कम पालक मोजतात पण यापैकी काही ठेकेदार व दलाल मुलांच्या जीवाशी खेळत आहे. अगदी खटारा झालेली वाहने ते यासाठी वापरत आहेत. मोठं मोठ्याशहरात अशा काल बाह्य झालेले स्कुल बसवर कार्यवाही केली जाते म्हणून काही दलाल ही वाहने ग्रामीण भागात कमी किंमतीत आणून विकतात व स्वतःच्या स्वार्था पोटी काही दलाल शाळकरी मुलांच्या जीवाशी खेळत आहे. त्या वाहनांचे स्ट्रक्चर ऑडिट कुणी करत नाही आरटीओ त्यांची कागपत्रे तपासत नाही.

विद्यार्थी घेऊन जाणाऱ्या अनेक वाहन चालकांकडे तर कागदपत्रे ही नाही. काही वाहन चालकांकडे इन्शुरन्स नाही. हे तपासायला कुणी रस्त्यावर येत ही नाही. ज्या लहान वाहनांची क्षमता १० ते १५ विद्यार्थी घेऊन जाण्याची क्षमता आहे. त्यात २० ते २५ मूल वज्या बसेसची ४० प्रवाशांची क्षमता आहे. त्या बसमध्ये मेंढरा सारखी ६० ते ७० मुलं कोंबून हा गोरख धंदा सुरू आहे. यामुळे मुलांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. याची वेळीच दखल घेऊन कालबाह्य झालेले वाहने आरटीओंनी जप्त करावे व नियमानुसार क्षमते पेक्षा ज्यास्त मुलांची वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध कठोर कार्यवाही करावी अशी मागणी शिवसंग्रामचे आष्टी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यानी केली आहे.

## बाळराजेंच्या राजकीय समीकरणात पंकजाताईचे बळ

# गेवराई माझी आई तिला जिवापाड जपणार : बाळराजे पवार

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराईच्या राजकारणात पंडित विरुद्ध पवार असा राजकीय संघर्ष पाहायला मिळालाय नगरपरिषद स्थापनेपासून प्रस्तुत पॅनल च्या माध्यमातून युवा नेते बाळराजे माधवराव पवार यांनी राजकारणात यशस्वी पाऊल टाकले मात्र मधल्या काळात अनावधानाने राजकीय द्वेषातून एका प्रकरणात त्यांना शिक्षा भोगावी लागली पण गेवराईकरांनी पवार कुटुंबावर जीवापाड प्रेम करत सलग दहा वर्ष माजी आमदार लक्ष्मण पवार विधानसभा सदस्य तर गेवराई नगर परिषदेवर सलग तीनदा विजयाचा झेंडा फडकविला.२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पवार कुटुंबीयांनी विधानसभेच्या रणांगणातून माघार घेतली होती. रनिंग आमदाराने माघार घेतल्यामुळे पक्षातील कार्यकर्ते बेचैन झाले होते. आपल्या नेत्याने निवडणुकीतून माघार घेतली मग विरोधकांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी आपल्या हक्काचे नेतृत्व हवं म्हणून मात्र कार्यकर्त्यांच्या अग्रस्थानी माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून परत विधानसभा सदस्य या पदासाठी निवडणूक लढवली पण अटीतटीच्या निवडणुकीत त्यांचा अल्पशामताने पराभव झाला. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने गेवराई विकास आघाडीचे पॅनल प्रमुख



बाळराजे माधवराव पवार लवकरच आजी-माजी नगरसेवक व सर्व सन्माननीय सदस्य यांच्यासोबत भारतीय जनता पार्टीत प्रवेश करणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळत आहे. युवा नेते बाळराजे पवार व त्यांचे सुपुत्र शिवराज पवार २९ जुलै मंगळवार जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची भेट घेतली आहे. मंत्रालयातील मंत्री कार्यालयात गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या विविध मुद्द्यावर तब्बल वीस मिनिटे पवारा व मुंडे यांच्यात चर्चा झाली असल्याची माहिती आहे मात्र या चर्चेचा तपशील समजू शकला नाही.

गेवराई नगर परिषदेच्या स्थापनेपासून गेवराई नगरपरिषद पवार कुटुंबीयांच्या ताब्यात आहे माजी आमदार शाहूराव पाटील त्यानंतर त्यांचे सुपुत्र माधवराव पवार अलीकडच्या काळात त्यांचे नातू माजी आमदार लक्ष्मण पवार अशाप्रकारे पाटलांनी तीन पिढ्या नगर परिषदेवर आपलं अधिराज्य गाजवले आहे पंडित व इतरांचा काही काळ वगळता गेवराई विकास आघाडी प्रमुख बाळराजे माधवराव पवार यांच्या पाठबळावर जनतेच्या आशीर्वादाने लक्ष्मण पवार हे नगराध्यक्ष तसेच दोनदा आमदार झाले परंतु आत्ता झालेल्या गेवराई विधानसभा निवडणुकीपासून भारतीय जनता पार्टी व त्यांच्या दुरावा निर्माण झाला आणि त्यांना पक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवावी लागली होती परंतु बाळराजे पवार हे एका प्रकरणातून मुक्त झाल्यानंतर त्यांनी भाजपाची जवळीक साधण्याचा प्रयत्न केला आहे. यात ते यशस्वी ठरले महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा प्रवेशासाठी ग्रीन सिग्नल दिला आहे. त्यावर नामदार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांचे शिक्कामोर्तब होणे गरजेचे होतें. पवार मुंडे यांच्या भेटीमुळे प्रवेशाचा मार्ग सुकर झाला असल्याची खरी माहिती समोर आली.

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठेच्या जयंतीनिमित्त बीड शहर पोलिसांचे रक्तदान शिबिराचे आयोजन

# वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपणारे पोलीस अधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर आणि बीड जिल्हा हा गुन्हेगारीचा जिल्हा म्हणून ओळखला जात आहे अशी परिस्थिती महाराष्ट्रमध्ये आहे की बीडला बिहार पेक्षा जास्त ओळख मिळाली आहेत यातच बीडची खाकी बदनाम झाली आणि त्या बदनामीचा दिंडोरा पिटणारे आपलेच काही नार्क्ते राजकीय पुढारी आहेत जे की पोलीस प्रशासनाकडे बोट दाखवत आहेत परंतु आज ही खाकीतील माणुसकी सर्वधर्मसमभाव सदरक्षणालय खलनिग्रणाले हेच ब्रीदवाखी घेऊन आज सुद्धा बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीड जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक पदाचा पदभार घेतल्यानंतर अनेक गुन्हेगारांना आता त्यांनी धडा शिकविण्याची काम केले आहे यातच आता त्यांची प्रेरणा ही सर्वच महापुरुषांच्या जयंतीनिमित्त पहायला मिळत आहे याचाच एक भाग म्हणजे बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांनी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त बीड शहर पोलीस स्टेशन या ठिकाणी रक्तदान हा उपक्रम राबविला आहे. आता बीड जिल्ह्य पोलीस अधीक्षक नवनीत कॉवताच्या प्रेरणास्त्रातून हे रक्तदान शिबिर संपन्न होत आहे.

बीड जिल्हा पोलीस दल हे नेहमी आणि गुन्हेगारांना वाचा फोडण्यासाठी गोरगरिबांच्या मदतीसाठी आणि सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेत अनेक सामाजिक







राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना प्रत्येक वेळी विचारात घेत सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी व सुखदुःख आनंदोत्सव अनेक उपक्रम या ठिकाणी ते राबवत आहेत हेच ते बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आहेत ज्यांनी बीडच्या गुन्हेगारीला आळा घालण्याचा काम केला आहे बीड शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांचे करावं तेवढं कौतुक कमी आहे कारण त्यांनी महापुरुषांचा विचार वारसा जपण्याचा काम या अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीच्या रक्तदान शिबिरातूनच नव्हे तर अनेक सामाजिक कार्यातून आपल्या कामाची पद्धत दाखवत आपल्या खाकीतील माणुसकी आणि सर्वधर्मसमभाव हे दाखवून दिले आहे.

त्यामुळे नवनीत कामत यांच्या टीम मध्ये असलेले बल्लाळ यांच्या बीड शहर पोलीस स्टेशनच्या वतीने रक्तदान शिबिराचे बीड शहरातील व अठरापगड जातीतील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे डॉ बाबासाहेब आंबेडकर छत्रपती शिवाजी महाराज सह सर्वच महापुरुषांच्या जयंतीनिमित्त वरिष्ठ अधिकारी निरीक्षक शितल बल्लाळ हे सदैव कार्यरत असतात पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांच्या कार्याचे कौतुक या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नवनीत कॉवत शिवकुमार बल्लाळ याचं बीड जिल्ह्यातील मातंग समाजाच्या वतीने स्वागत करण्यात आलेला आहे.

# रमेश राठोड यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषण

**सिरसाळा । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील रत्ननगर तांडा जळगव्हाण येथील अंगणवाडी सेवीका मागील सहा महिण्यांपासुन प्रसुती करीता तिसरे अपत्यलपवण्यासाठी कोणतेही तथ्य नसलेले खाजगी कारण पुढे करत गावकऱ्यांची व प्रशासनाची दिशाभुल करत अंगणवाडी केंद्रामध्ये गैरहजर आहे. याबाबतीत आपणास व संबंधीत विभाग ए.बा.वि. से.यो. पंचायत समिती परळी यांना कळवले असता संबंधित विभागाकडुन सेवीकेला चौकशीसाठी बोलवण्यात आले परंतु त्यांच्या याबाबी निदर्शनास आल्याच्या नंतर सुध्दा कार्यवाहीस टाळाटाळ करण्यात आली खाजगी कारनास्तव गेली असल्याचे सांगत पुर्ण विराम दिला गेला.

तसेच या आधी खाऊ वाटपात मोठ्या प्रमाणात खोट्या स्वाक्षरी करून अपहार सुध्दा केला गेला आहे व तसेच चालु अंगणवाडीचे फोटो अपलोड न करता घरी वसुन आपली ऑनलाईन हजरी लावुन बालकांच्या




**रत्ननगर तांडा जळगव्हाण येथील अंगणवाडी सेविकेच्या मनमानी कारभाराविरोधात उपोषणास दुसरा दिवस**

आरोग्याशी खेळ करुन सतत अंगणवाडी बंद ठेवुन गायब आहे. याची पण चौकशी करण्यात यात्री आणि मुख्यत्वे करुन यावेळी सेवीकेच्या वेळीच संबंधीत विभागाने प्रसुत्ती संदर्भात चौकशी न केल्याने सेवीकेच्या खाजगी व प्रसुती च्या कारणामध्ये किती तथ्य आहे हे पाहणे गरजेचे आहे. या करिता संबंधीत सेवीकेची प्रसुती संदर्भात प्राथमीक आरोग्य तपासणी करून प्रसुत्ती झाली आहे का नाही? योग्य तो अहवाल सादर करावा, या सर्व बाबी तपासुन अंगणवाडी सेवीका तसेच संबंधीत विभागाकडुन सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी त्या अनुषंगाने दि.१८/०७/२०२५ निवेदनाव्दारे आपणास कळविले होणे परंतु कोणत्याही प्रकारे चौकशी कार्यवाही करण्यात आली नाही म्हणूण आज दि.२९/३/२०२५ बसले आहेत.व त्याच बरोबर राठोड यांच्या मागणीनुसार संबंधीत प्रकरणी प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी व दोषींवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे दिलेल्या निवेदनातुन म्हटले आहे.

# अण्णाभाऊ साठे जन्मोत्सव निमित्ताने श्रधदेय बाळासाहेब आंबेडकर, डॉ. मिलिंद आवाड याची प्रमुख उपस्थिती

## मानवी हक्क अभियानच्या वतीने आयोजित कार्यक्रमास उपस्थित रहा : रमेश गवळी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तळागाळातील समाजातील तरुणांनी डॉक्टर, वकील, पोलीस, कलेक्टर झाले पाहिजे ही संकल्पना उराशी बाळगून समस्त दलित चळवळीच्या एक्काळी पाठीचा कणा राहिलेल्या दिवंगत कर्मवीर एकनाथरावजी (जीजा) आवाड यांच्या विचार धारेचा समाज घडविण्याचा वसा अंगीकृत करून समाजाला समविचारी विचार धारेशी जोडण्याचे काम करत असलेले मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष प्रा.डॉ. मिलिंद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी हक्क अभियान बीड जिल्हा शास्खा माजलगाव आयोजित लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सव सोहळा १ ऑगस्ट रोजी ठिक २ वाजता वैष्णवी मंगल कार्यालय माजलगाव येथे पार पडत आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर भूषवणार आहेत.

तर उद्घाटक म्हणून दिल्ली येथील जवाहरलाल नेहरु विद्यापीठाचे प्राध्यापक तथा मानवी हक्क अभियानचे







अध्यक्ष डॉ. मिलिंद आवाड हे असणार आहेत. या कार्यक्रमासाठी आमदार प्रकाश दादा सोळंके, मा.आ मोहनराव सोळंके, मा.आ. राधाकृष्ण होके पाटील, मा.आ. डी.के. देशमुख, मोहनराव जगताप, बाबुराव पोटभरे ओमप्रकाश शेटे, जयसिंग सोळंके जयदत्त नरवडे, सचिन उजगरे, उमेश काका मोगरेकर, प्रा. अर्जुन तनपुरे, नितीन दादा नाईकनवरे, श्रीहरी मोरे, सहाल भैय्या चाऊस, प्रभाकर नानासाहेब घोडके, साळेगावकर, धम्मानंद साळवे, अरुणराव राऊत, अविनाश तात्या जावळे, डॉ. ज्ञानेश्वर गिलबीले डॉ. प्रकाश आनंदगावकर, दयानंद स्वामी, शिवाजी सुतार, डॉ. दिनकर मस्के अरुण झगळे, कचरु तात्या खळगे, मनमोहन कलंत्री, कॉ. दत्ता डाके, तुकाराम येवले ॲड. तथागत कांबळे, मोहन जाधव, गंगाभिषण थावरे, भिमराव नाडे, आंकुश जाधव, अजय शिंदे, विजय दादा साळवे, ॲड. नारायण गोले, भारत तांगडे, ॲड. डोंगरदिवे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तरी या सोहळ्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मानवी हक्क अभियान बीड जिल्हा शाखा माजलगाव व जयंती महोत्सव समिती २०२५ आयोजक राजेश क्षिरसागर, मधुकर कांबळे, रमेश गवळी, बंडु लोखंडे, बाबासाहेब थोरात, महादेव उमाप, कचरु कांबळे, पांडुरंग घडसिंगे, बंडु खंडागळे, संदिप वाघमारे, विष्णु मुजमूले, बबन खंडागळे, प्रल्हाद दळवी, छगन क्षिरसागर, आप्पाराव भारस्कर, राधे कांबळे, भारत जाधव, रमेश जाधव, आप्पाराव मुजमूले, किशन लोखंडे, परमेश्वर अडागळे, अनिकेत वाघमारे, कपिल अडागळे, बाबासाहेब मुजमूले, राहुल आवाड, प्रल्हाद कांबळे, राजेश थोरात, विनोद गायकवाड, तुळसीराम आवाड, अक्षय गवळी, महादेव अडागळे, अशोक थोरात, प्रकाश थोरात, बळीराम कारके, कपिल आडागळे, धोंडाम हातागळे, मारोती भिसे यांच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT